
12-04-2025-Dai-01-final_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/11/2025 11:25 PM Page 1



कुर्टी-फोंडा नाला कचऱ्याच्या विळख्यात
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



गुजरात-लखनऊ आज भिडणार
पान ४ वर

वेर्णा, शनिवार, १२ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 219 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 12 April 2025 | Pages 4 | ₹ 4

# प्रस्तावित खाजगी जेट्टीला स्थानिकांचा तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ : मालिम येथे खाजगी जेट्टी उभारण्यासाठी भारत सरकारने ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर स्थानिक मच्छीमार आणि पर्यावरणवादी संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. ही खाजगी जेट्टी म्हणजे मरीना प्रकल्प असल्याचा आरोप या कार्यकर्त्यांनी केला आहे. सुमारे १४० ट्रॉलर मालक या जेट्टीचा नियमित वापर करतात. या पार्श्वभूमीवर स्थानिक समुदायाला विश्वासात न घेता सरकारने हा निर्णय घेतल्यामुळे संताप व्यक्त होत आहे.**



२००९ मध्ये नावशी, बांबोळी येथे प्रस्तावित पहिल्या मरीना प्रकल्पाला स्थानिक मच्छीमार आणि पर्यावरणवाद्यांनी कडाडून विरोध केला होता.

याबाबत पेन्ह द फ्रान्स गाव पंचायत जैवविविधता व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणपत सिद्धये यांनी सांगितले की, या प्रकल्पाविषयी कोणताही तपशील देण्यात आलेला नाही. सरकारने स्थानिकांशी सल्लामसलत न करता हा प्रकल्प पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. जैवविविधतेशी संबंधित प्रश्न असल्याने ग्रामसभेत यावर चर्चा होणे आवश्यक आहे. हा प्रकल्प मच्छीमारांसाठी अडथळा निर्माण करेल तसेच स्थानिक रस्ते आणि पायाभूत सुविधांवर अतिरिक्त ताण पडेल. आधीच मांडवी नदी कॅसिनो बोटी आणि क्रूझ वाहतुकीमुळे गजबजलेली आहे. अशा परिस्थितीत आणखी प्रकल्पांची भर पडल्यास नदीच्या पर्यावरणीय स्थितीवर गंभीर परिणाम होईल.

पेन्ह द फ्रान्स गाव पंचायतीचे बीएमसी सदस्य आणि पर्यावरणवादी प्रवीणसिंग शेटगावकर यांनी देखील सरकारवर टीका करत म्हटले की, मालिम जेट्टी ही पारंपरिक मच्छीमारांसाठी वापरण्यात येणारी जेट्टी आहे. मात्र, सरकार मरीना प्रकल्पाच्या नावाखाली ही सुविधा कॅसिनो चालकांना देण्याच्या तयारीत आहे. जर खाजगी खेळाडूला ही जेट्टी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर वाटत असेल, तर भाजप सरकार त्यास कॅसिनो व्यवसायासाठी वापरण्याची परवानगी देईल. समुद्रकिनाऱ्यांवर मरीना प्रकल्प परवानगीसाठी विचारात घेतले जावेत, परंतु त्यासाठी आवश्यक पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (इआयए ) अद्याप करण्यात आलेले नाही.

नावशी येथे मरीना प्रकल्पाविरोधात आंदोलनाचे नेतृत्व करणारे माजी जिल्हा पंचायत सदस्य अॅड. सुरेश पालकर यांनीही चिंता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, मांडवी नदी आधीच कॅसिनो आणि क्रूझ बोटीमुळे व्यापलेली आहे. आता या प्रस्तावित जेट्टीमुळे मच्छीमारांच्या उपजीविकेवर परिणाम होईल. तसेच शंख माशांवर प्रतिकूल परिणाम होऊन त्यांचे अस्तित्व धोक्यात येईल.

पर्यावरण कार्यकर्ते अॅड. शंकर फडते यांनी स्पष्ट केले की, अंतर्गत जलमार्ग विकासाचा मुख्य उद्देश सर्वसामान्य नागरिक आणि पर्यटकांना सोयीस्कर वाहतूक सुविधा पुरवणे असायला हवा. मात्र, सध्या राज्य सरकार पायाभूत सुविधा आणि संसाधने खाजगी कंपन्यांना सुपूर्द करत आहे, ज्यामुळे संभाव्य भ्रष्टाचाराची शक्यता निर्माण होत आहे. मरीना प्रकल्पांचा अंतर्गत जलमार्ग विकासाशी संबंध नाही. या प्रकल्पांचा फायदा मुख्यतः श्रीमंत आणि लक्झरी पर्यटनासाठी होणार आहे.

मांडवी फिशरमेन मार्केटिंग को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडचे अध्यक्ष फ्रान्सिस्को डिसोझा यांनीही या प्रकल्पाबाबत अनभिज्ञता दर्शवली. त्यांनी सांगितले की, आम्ही अनेक वर्षांपासून मासेमारीसाठी मालिम जेट्टीचा वापर करत आहोत. मात्र, या नव्या खाजगी जेट्टीविषयी

पान २ ▶

## पाटो पूल बंद असल्यामुळे वाहतूक कोंडीचा फटका

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** राजधानीतला नवीन पाटो पूल दुरुस्तीमुळे बंद असल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. शुक्रवारी, पाटो परिसर आणि शहराच्या मुख्य मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या, ज्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली. दुरुस्तीच्या कामांमुळे हा पूल १४ एप्रिलपर्यंत बंद राहणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे. मुख्यतः खराब झालेल्या विस्तारित जोड्यांच्या दुरुस्तीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

शहरातील प्रमुख मार्गांवर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. सकाळी १० ते दुपारी १२ आणि संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत विशेषतः वाहतूक अत्यंत संथ गतीने सुरू होती. मेरशी आणि भाटले येथून पणजीत येणाऱ्या तसेच शहरातून बाहेर जाणाऱ्या रस्त्यांवरही वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या बंदमुळे नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शहरातील एका खाजगी कंपनीतील कार्यकारी मधू नाईक यांनी सांगितले की, अशा उष्णतेत आम्हाला अर्धा तास उन्हात अडकून राहावे लागत आहे. रस्त्याची दुरुस्ती याच महिन्यात का करावी लागली ?

कळंगुट येथील रहिवासी क्रिस्टीना फर्नांडिस यांनीही याबाबत अस्वस्थता व्यक्त करत सांगितले की , पणजीतील वाहतूक कोंडी आधीच गंभीर आहे. त्यात हा पूल बंद असल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे.

वाहतूक कोंडीचा परिणाम स्थानिक व्यवसायांवरही झाला आहे. अन्न वितरण सेवा उशिरा पोहोचल्याने ग्राहकांच्या तक्रारी वाढल्या. एका अन्न वितरण कर्मचाऱ्याने सांगितले की ,, वाहतूक कोंडीमुळे वेळेत ऑर्डर पोहोचवणे अवघड झाले. काही ग्राहकांनी ऑर्डर रद्द केल्या.

गोवा वाहतूक पोलिसांनी नागरिकांना लेन शिस्त पाळण्याचे आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ओव्हरटेकिंग न करण्याचे आवाहन केले आहे. वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी 'एक्स' वरील पोस्टद्वारे वाहनचालकांना सहकार्याची विनंती केली आहे .

वाहतूक शाखेने कोंडी कमी करण्यासाठी पर्यायी मार्ग आखले आहेत . यामध्ये सकाळी नवीन पाटो पुलावर (नदीकाठी) दोन्ही दिशांना वाहतुकीस परवानगी दिली जाईल. जुन्या पाटो पुलावरील वाहतूक उलटवून तो केवळ पणजीमध्ये येण्यासाठी वापरण्यात येईल. उमेश केणी पेट्रोल पंपमार्गे डी. बी. मार्गावर जाण्यासाठी सोहो क्लबजवळ उजवीकडे वळण्याची परवानगी असेल. चर्च स्क्वेअर – कॉर्टिन मार्गे बाहेर पडणाऱ्या वाहनांसाठी नवीन माला पुलावरून बाहेर पडणे बंधनकारक असेल. जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या जड वाहनांना केवळ नवीन माला पूल किंवा बांबोळीच्या गोवा मेडिकल कॉलेजमार्गे शहरात प्रवेश करण्याची परवानगी असेल.

## निवडक

### जम्मूत कारवाईत दहशतवादी ठार

जम्मू, दि. ११ :
जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईमध्ये एक दहशतवादी ठार झाला. उधमपूर व किश्तवाड येथे शुक्रवारी राबवलेल्या कॉम्बिंग ऑपरेशनमध्ये हा दहशतवादी ठार झाला. अन्य तिघांची शोध मोहीम सुरु असल्याची माहिती सुरक्षादलांनी दिली आहे. दोडा जिल्ह्यातील भादेवाडा परिसरात सुरक्षा एजन्सीजनी शोध मोहीम राबविली जात होती. त्यावेळी जंगलात दहशतवादी त्यांचे लोकेशन वारंवार बदलत होते. त्यानंतर सैन्यदल व काश्मीर पोलिसांनी संयुक्त शोधमोहीम राबविली जात होती. यावेळी ठिकाण बदलत असताना त्यांची दहशतवाद्यांशी चकमक झाली. यामध्ये १ दहशतवादी ठार झाला तर तिघे जंगलात लपले आहेत. त्यांना पकडण्यासाठी शोधमोहीम राबविली जात आहे.

------------

### १८.२२७ कोटींचे हेरॉइन जप्त

**चंदिगढ, दि. ११ :**
पंजाब पोलिसांच्या अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्स (एएनटीएफ) बॉर्डर रेंज अमृतसरने एका संघटित कारवाईअंतर्गत मोठे यश मिळवले आहे. पथकाने अमृतसर येथील घरिंडा ठाण्यातील खैरा गावातील रहिवासी हीरा सिंग याला अटक केली आणि त्याच्या ताब्यातून १८.२२७ कोटींचे हेरॉइन जप्त केले.
हीरा सिंग आणि त्याचा साथीदार कुलविंदर सिंग ऊर्फ किंडा (गाव दौके, पोलिस स्टेशन घरिंडा) हे पाकिस्तानस्थित ड्रग्ज तस्कर 'बिल्ला' याच्या संपर्कात होते. बिल्लाच्या सूचनेनुसार हे दोघेही सीमेपलीकडून हेरॉइनची तस्करी करायचे आणि पंजाबमध्ये ते पुरवायचे. हेरॉइन पाकिस्तानमधून ड्रोनद्वारे पोहोचवले जात होते किंवा सीमावर्ती भागात निश्चित ठिकाणी सोडले जात होते. बिल्लाच्या सूचनेनुसार, हीरा सिंग आणि त्याचा साथीदार हे सामान उचलून राज्याच्या विविध भागात तस्करी करायचे, असे तपासात उघड झाले आहे. हीरा सिंगला अटक करण्यात आली असली तरी त्याचा साथीदार कुलविंदर सिंग अजूनही फरार आहे. पोलिस पथके त्याच्या संभाव्य लपण्याच्या ठिकाणांवर सतत छापे टाकत आहेत. या नेटवर्कमध्ये आणखी कोण कोण सामील आहे हे देखील सुरक्षा संस्था शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

---------------

### पीएफ काढणे आता सोपे

नवी दिल्ली, दि. ११ : ईपीएफओच्या प्रत्येक सदस्याला कंपनीच्या एचआरकडून युनिव्हर्सल अकाऊंट नंबर (यूएएन) दिला जातो. पीएफची रक्कम काढण्यासाठी यूएएन नंबरचा उपयोग होतो. मात्र आता पीएफची रक्कम काढण्यासाठी एचआरची गरज लागणार नाही. ईपीएफओ सदस्य उमंग' ॲपच्या सहाय्याने स्वतःच यूएएन नंबर जनरेट करू शकतो आणि ईपीएफओच्या सर्व सेवांचा लाभ घेऊ शकतो. कर्मचारी प्रॉव्हिडंट फंडच्या सर्व सेवा आता सरकारच्या उमंग' ॲपच्या माध्यमातून मोबाईलमध्ये उपलब्ध होणार आहेत. उमंग ॲपवरून कर्मचारी स्वतःच यूएएन नंबर जनरेट करू शकतात. उमंग' ॲप हे अँड्रॉईड आणि आयओएस अशा दोन्ही मोबाईलवर उपलब्ध आहे. उमंग ॲपवर ईपीएफओ सेवा सुरू झाल्यास पीएफधारकांना मोबाईल फ्रेंडली प्लॅटफॉर्म उपलब्ध होईल. सध्या ईपीएफओ वेबसाईटवर ज्या अडचणी येत आहेत, म्हणजे सर्व्हर डाऊन किंवा स्पीड कमी असणे, त्या येणार नाही. जूनपासून नवीन प्लॅटफॉर्म सुरू होईल, असे कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी सांगितले.

### हवामान

कमाल : ३३ किमान : २३
आर्द्रता : ७३

### बाजार भाव

सोने : ₹ ९१,३०० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९३,६०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७५,१७५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २२,८३८.९० ↑ (८३.९५)

## शिकारीदरम्यान गोळीबार; एकाचा मृत्यू, आरोपी अटकेत

■ टीम दैनिक हेराल्ड

**वाळपई, दि. ११ :** सत्तरी तालुक्यातील अडवई येथील जंगलात बेकायदेशीर शिकारीदरम्यान झालेल्या गोळीबारात एका तरुणाचा मृत्यू झाला. याप्रकरणी वाळपई पोलिसांनी संशयित आरोपीला अटक केली असून, घटनेचा सखोल तपास सुरू आहे.

गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास अडवई-सत्तरी येथील जंगलात हेमंत हिरबा देसाई (३३) आणि अभिजीत नारायण देसाई (३४) हे दोघे भाऊ रानटी जनावरांच्या शिकारीसाठी गेले होते. यावेळी झालेल्या गोळीबारात हेमंत गंभीर जखमी झाला. घटनेनंतर अभिजीतने आपल्या नातेवाईकांना माहिती दिली आणि जखमी हेमंतला जंगलातून मुख्य रस्त्यावर आणून वाळपई येथील इस्पितळात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी वाळपई पोलिसांनी घटनास्थळी तपास केला. पोलिस उपअधीक्षक जीवबा दळवी, वाळपई पोलिस निरीक्षक विदेश शिरोडकर, निरीक्षक प्रथमेश गावस तसेच फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी जाऊन तपास केला.

मृत हेमंतच्या काकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, हा अपघात नसून हेतुपुरस्सर घडवलेला प्रकार असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यानुसार पोलिसांनी अभिजीत देसाई याच्यावर गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. पोलिसांनी घटनास्थळी सापडलेली बंदूक, रिकामे काडतूस तसेच संशयित आरोपीची स्कूटर जप्त केली आहे. प्राथमिक तपासात ही बंदूक बेकायदेशीर असल्याचे समोर आले असून, आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता, शस्त्र कायदा आणि वन्यजीव संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही महिन्यांत सत्तरी परिसरात बेकायदेशीर शिकारीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. डिसेंबर महिन्यातही अशाच एका प्रकरणात जंगलात शिकारीदरम्यान एका तरुणाचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर वन विभाग व पोलिस प्रशासनाने कडक कारवाई करण्याची गरज असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान, हेमंतचा मृतदेह शवविच्छेदनासाठी गोवा वैद्यकीय महाविद्यालय येथे पाठवण्यात आला आहे. वाळपई पोलिस पुढील तपास करत आहेत

## देवतेच्या नावाने बनावट लॉटरी कूपन विक्री

**धक्कादायक प्रकार उघडकीस | भाविकांत संताप, कारवाईची मागणी**

संतोष नाईक / टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ११ :** येथील प्रसिद्ध झरेश्वर देवतेच्या नावाने बनावट देणगी कूपन विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे भाविकांमध्ये संताप व्यक्त होत असून, संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



झरेश्वर मंदिर हे फोंड्यातील प्रमुख श्रद्धास्थान मानले जाते. बुधवार व रविवारी येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, या मंदिराच्या नावाने श्री झरेश्वर संगीत सांस्कृतिक संस्थान या संस्थेच्या नावाखाली लॉटरी कूपन विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

या प्रकरणी नगरसेवक व्यंकटेश नाईक यांनी स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, झरेश्वर देवतेच्या नावाने दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. मात्र, श्री झरेश्वर संगीत सांस्कृतिक संस्थान नावाची कोणतीही अधिकृत संस्था अस्तित्वात नाही. त्यामुळे भाविकांची फसवणूक केली जात असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. व्यंकटेश नाईक यांनी सांगितले की, भाविक हे बक्षीस मिळविण्याच्या उद्देशाने नव्हे, तर देवतेच्या प्रति श्रद्धेने लॉटरी कूपन खरेदी करतात. त्यामुळे हा सरळसरळ भाविकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेतला जाण्याचा प्रकार आहे.

या बनावट लॉटरी तिकिटांवर कोणत्याही अधिकृत व्यक्तींची स्वाक्षरी अथवा नोंदणी क्रमांक नसल्याचे आढळून आले आहे. ही कूपन गर्दीच्या ठिकाणी विक्री केली जात असून, एक कूपन २०० रुपयांना विकले जात आहे. या लॉटरीमध्ये प्रथम बक्षीस २० लाख रुपये, द्वितीय बक्षीस १० लाख रुपये, तृतीय बक्षीस ५ लाख रुपये, चौथे बक्षीस २५ हजार रुपये आणि पाच सांत्वन बक्षिसे प्रत्येकी ५ हजार रुपयांचे असल्याचे दर्शवण्यात आले आहे.

नगरसेवक नाईक यांनी यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी आल्याचे सांगितले. काही वर्षांपूर्वीही बनावट लॉटरी तिकीट विक्रीचा प्रकार उघडकीस आला होता. लॉटरी खरेदी करणारे भाविक ड्रॉबद्दल विचारणा करण्यासाठी फोंड्यात येत होते, तेव्हा हा प्रकार समोर आला होता. यासंदर्भात फोंडा , माशेल,
उसगाव, सावर्डे आणि गोव्याच्या इतर भागांतही अशी बनावट लॉटरी विकली जात असल्याचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा कूपनच्या मोहात न पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी चौकशी सुरू केली असून, या घोटाळ्यातील दोषींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत दिले आहेत.

## वक्फ कायद्याच्या विरोधात हिंसक निदर्शने

मुर्शिदाबाद, दि. ११ :

पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यात सुधारित वक्फ कायद्याच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर शुक्रवारी पुन्हा हिंसाचार उसळला. निदर्शकांनी पोलिसांची जीप जाळली तसेच अनेक वाहने व मोटारसायकलींची तोडफोड केली. जांगीपूर भागात या आंदोलनाने उग्र स्वरूप घेतले असून, स्थानिक तृणमूल काँग्रेस खासदार खलीलूर रहमान यांच्या कार्यालयावरही हल्ला करण्यात आला.

परिसरात तणाव वाढल्याने प्रशासनाने मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात केला असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्ह्यात इंटरनेट सेवाही तात्पुरती बंद करण्यात आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी शेकडो निदर्शकांनी राष्ट्रीय महामार्ग १२ वरील धुलियानजवळील शाजुरमोर क्रॉसिंगवर आंदोलन केले. महामार्ग अडवण्याचा प्रयत्न करण्यात येत असताना पोलिसांनी हस्तक्षेप केला. मात्र, जमावाने पोलिसांवर दगडफेक केली आणि हिंसक कारवाया सुरू केल्या. पोलिसांनी जमाव हटवण्याचा प्रयत्न केला असता निदर्शकांनी पोलिसांची जीप व मोटारसायकली पेटवून दिल्या. महामार्गावर अडकलेल्या इतर वाहनांवरही दगडफेक करण्यात आली,असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केला तसेच अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या.

या हिंसाचारात तृणमूल काँग्रेसचे खासदार खलीलूर रहमान यांच्या धुलियानमधील कार्यालयाची तोडफोड करण्यात आली. रहमान

पान २ ▶

